सी.सी./12530. राजेंद्र शंकर राऊत, नाशिकरोड मध्यवर्ती कारागृह, नाशिक येथे शिक्षाबंदी असुन मा. जिल्हा न्यायाधीश व अति सत्र न्यायाधिश, नाशिक यांनी मला सुरगाणा पोलीस स्टेशन गु.र.क्र. 54/2013, सेशन केस क्र. 29/2014 कलम 302 भा.द.वि. अन्वये दोषी धरून दि. 06/02/2020 रोजी जन्मठेपेची शिक्षा दिलेली असुन सदरची शिक्षा मी कारागृहीन नियम व अटीच्या अधीन राहुन भोगत आहे...

"Me Holistic Center" मार्फत कारागृहामध्ये भगवद्गीतेवर आधारित सत्र घेतले जात होते. श्रीमती मंजुश्री राठी मॅडम या भगवद्गीतेमधील श्लोकांच्या माध्यमातून बंद्यांच्या मनामधील नकारात्मकते सह बंद्यांना पडलेल्या असंख्य प्रश्नांची उत्तरे देऊन बंद्यांना जीवनाविषयी सकारात्मक दृष्टीकोन यावा याच दिशेने घेऊन जाण्याचे काम मॅडम अगदी सहज करत होत्या. जीवन, संघर्ष, नियती, प्रारब्ध, संचित, कर्म, कर्तव्य या आणि अशा अनेक ग्रहणास कठीण समजल्या जाणाऱ्या विषयांना मॅडम अगदी सुलभ आणि सोप्या पद्धतीने बंद्यांना समजावुन सांगत असत. त्यामुळेच बंद्यांच्या मनात उत्पन्न होणाऱ्या असंख्य प्रश्नांची उत्तरे मिळत असत, बंद्यांना जीवनाची एक नवी दिशा मिळत असे. ध्यान, साधना, प्राणायाम यासह आध्यात्मिक विषयांचे मॅडम अधिक सुलभ विश्लेषण करून सांगत असत. त्यामुळेच अत्यंत हतबल अशा नैराश्याच्या अवस्थेतही बंदी स्वतःला स्थिर ठेऊ शकत. मी सुद्धा तणावातच होतो पण आज केवळ मॅडम मुळे मी स्थिर आहे, त्यासाठी मॅडमचे मनापासुन खुप खुप धन्यवाद...

मी एका जिल्हा परिषद प्राथमिक शाळेवर प्राथमिक शिक्षक म्हणुन कार्यरत होतो. माझे लग्न झाले होते. लग्नानंतर 5 महिन्यातच माझी पत्नी (प्रिया) मला कायमचं सोडुन गेली... मी आध्यात्मिक वारसा असलेला अत्यंत हळवा, अत्यंत भावनाशील मुलगा होतो. माझ्या लग्नानंतर मी माझ्या पत्नीसह वैवाहिक आयुष्य अत्यंत आनंदात जगत होतो. दिवाळी जवळ आल्याने मी माझ्या पत्नीसोबत शॉपिंगसाठी नाशिकला आलो होतो. दिवसभर शॉपींग करून रात्री आम्ही आमच्या मोटार सायकलवरून सुरगाणा येथे निघालो दिवसभर आम्ही बरीच शॉपिंग केली होती. जवळपास 9:00 ते 9:30 वाजेच्या दरम्यान आम्ही घिरई घाटात पोहचलो होतो. आमची रूम जवळच होती. पण घिरई घाटातच आम्हाला काही अनोळखी लोकांनी अडवले

व आम्हाला मारहाण करु लागले... त्यांनी आमच्या दोघांच्याही डोळ्यात तिखट मिरचीची पुड भरली होती. अनंत वेदना होत होत्या. तरीही मी ओळखले की ते आम्हाला लुटण्यासाठी आले होते. मी माझ्या पत्नीला घट्ट हृदयाशी धरुन ठेवले होते. डोळ्यात मिर्चीमुळे होणारी आग आम्हा दोघांनाही असह्य होत होती. आमची झटापट सुरु होती. तरीही मी त्यांना पैसे, दागिने देण्यास तयार होतो. सर्व घेऊन जा पण आम्हाला मारु नका अशी मी त्यांना अत्यंत कळकळीने विनंती करीत होतो. त्यांनी माझ्या मिठीत असणाऱ्या माझ्या पत्नीला दूर करण्याचा प्रयत्न केला तेव्हा मात्र मी सुद्धा आक्रमक झालो, प्रियाला काही होऊ नये म्हणुन मी लढायचे ठरवले होते. मारामारी सुरु झाली, मला काहीच दिसत नव्हते. मिर्चीमुळे डोळ्यांत अत्यंत आग होत होती तरीही मी माझ्यावर होणारे वार सहन करत होतो प्रियाला आवाज देत होतो. पण जेव्हा माझ्या पोटावर धारदार शस्त्राने वार झाला तेव्हा मी गर्भगळीत झालो. रक्त वाहु लागले होते. तेवढयात माझ्या हातात आलेल्या व्यक्तीला मी घट्ट पकडले, त्याला मारत मारत प्रियाला आवाज देऊ लागलो, पण तिचा आवाज येणे बंद झाले होते. तेवढयात माझ्या हातावर परत त्याच शस्त्राने दुसरा वार झाला, मी खुपच घाबरुन गेलो होतो. डोळ्यांत मिर्ची पावडर होती, पोटावर वार झाला होता, आणि हातावरही वार झाला होता. अशा अत्यंत कठिण दुःखकारी अवस्थेतही मी प्रियासाठी धडपडत होतो. मी मृत्युला तर घाबरत नव्हतो परंतु, प्रियाचा आवाज माझ्या कानी पडत नव्हता म्हणून मी घाबरलो होतो. हतबल होऊन गुडघ्यावर बसून होतो. परंतु ती वेळ स्वस्थ बसण्याची नव्हतीच मुळी मी माझ्या सर्वांगातील त्राण एकवटून परत उठलो, मला फक्त प्रियाचा शोध घ्यायचा होता मी धडपडत इकडे-तिकडे धावत होतो, पडत होतो, परत उठून धडपडत होतो. इतक्यात अचानक प्रिया मला येऊन धडकली, मी तिला परत घट्ट हृदयाशी धरले, कदाचित तिलाही मारले होते. आम्ही दोघे एकमेकांच्या मिठीत होतो आणि वरुन ते लोक आम्हाला मारत होते. त्यांनी परत प्रियाला माझ्यापासून दूर नेले. माझ्या डोक्यावर झालेल्या एका जबरी वारामुळे मी बेशुद्ध होऊन पडलो...

मला जेव्हा शुद्ध आली तेव्हा मी नाशिक सिव्हील हॉस्पीटलमध्ये होतो, दुसऱ्या दिवसाची दुपार आली होती. मला

शुद्ध येताच पोलीस माझी चौकशी करु लागले. पण मी प्रियाला शोधत होतो. पण ती कुठेच दिसली नाही. मी पोलीसांना जे सत्य तेच सांगितले... त्यानंतर संध्याकाळी पोलीस मला सुरगाणा पोलीस स्टेशनला घेऊन गेले. प्रियाच्या खुनाच्या आरोपाखाली त्यांनी मलाच अटक करून लॉकअप मध्ये टाकले... प्रिया नव्हती हेच माझे मन स्विकारत नव्हते मी सुन्न होतो, अगदी सुन्न, अचेतन होतो. नंतर त्यांनी (पोलीसांनी) मला नाशिकरोड मध्यवर्ती कारागृह येथे दाखल केले.

अशा भयंकर करूण अवस्थेत जगावं तरी कसं तेच मला कळत नव्हतं. त्या काळ्या रात्रीविषयी लिहीत बसलो तर एक पुस्तक निश्चित बनेल... माझ्या आयुष्यातली सर्वात जवळची व्यक्ती माझी पत्नी प्रिया माझ्यापासून कायमची दूर गेली, त्या काळ्या रात्रीच्या केवळ 10 ते 20 मिनीटांच्या झटापटीत मी संपूर्णपणे नष्ट झालो होतो, शून्य झालो होतो, माझे संपूर्ण आयुष्य उध्वस्त झाले होते. आणि माझ्याच प्रियाच्या खूनाच्या आरोपात मलाच अटक करून जेलमध्ये टाकण्यात आले होते. अशा अवस्थेत जगावं तर वाटतच नव्हते म्हणून मी दोन-चार वेळा आत्महत्या करण्याचाही प्रयत्न केला पण त्या प्रत्येकवेळी मी वाचलो. जगायचं तर नव्हतंच मला, माझ्या अंतर्मनात भयंकर युद्ध सुरु होते. आयुष्यात मी कधीच कोणाला त्रास होईल, कोणाच्या भावना दुखावतील असे वागलो नाही, मला तर साधी शिवीपण देता येत नव्हती, कधी चोरी केली नाही कधी मारामारी नाही. आध्यात्मिक वातावरणात वाढल्याने भगवंतावर श्रद्धा अपार होती ती एका क्षणात नष्ट झाली होती, माझ्याच आयुष्यात मग असे वादळ का आले? मी कुठे चुकलो असे असंख्य प्रश्न मला आत्महत्या करण्यास रोज नव्याने प्रवृत्त करत होते.

पण.... पण... आजही मी जिवंत आहे. माझ्या विचारांवर स्थिर आहे ते केवळ आणि केवळ राठी मॅडममुळेच. त्या नसत्या तर मी कधीच आत्महत्या केली असती. स्वतःला कधीच संपवले असते. परंतु "The Holistic Center" मार्फत कारागृहात सत्र घेऊन बंद्यांच्या मानसिक अवस्था स्थिर करण्याचा, त्यांना एक नवी दिशा देण्याचा प्रयत्न करणाऱ्या श्रीमती. मंजुश्री राठी मॅडम यांच्या सत्रात मी गेलो आणि खरंच माझ्या जीवनाला एक वेगळी दिशा मिळाली. त्यांनी माझ्या मनात उठलेल्या असंख्य

वादळरूपी प्रश्नांना उत्तरे मिळवून दिली. मॅडमच्या अगदी समर्पक उत्तरांनी त्यांच्या प्रांजळ वाणी आणि भगवद्गीतेच्या संदर्भाने त्यांनीच मला मृत्युपासून वाचवले असे मी म्हणालो तर ते अतिशयोक्ती मुळीच ठरणार नाही.

मॅडमनी माझ्या जीवनाला परत अर्थ मिळवून दिला. परत एक दिशा दिली, माझ्या मनात उठलेल्या वादळाला शांत केले, माझ्या विचारांना (भरकटलेल्या) परत पूर्वपदावर आणले. माझ्या सुप्तगुणांना जागृत केले, स्वतःवर विश्वास ठेवायला शिकवले, प्रिया मला सोडून गेली नाही तर ती कायमची माझ्यातच सामावून गेली आहे असे निर्धाराने सांगितले, मी स्वतःला त्रास दिला तर तो प्रियालाच दिल्यासारखे आहे म्हणून मला चांगले वागण्यास प्रवृत्त केले. मॅडमनी मला आवरले अन सावरलेही म्हणूनच आजही मी स्थिर आहे. माझ्या सुप्त शक्तींना जागृत करून मी जवळपास 11 स्वतःच्या पुस्तकांचे लिखाण केले, शेकडो पुस्तकांचे वाचन केले. सर्व काही ठिक होईल असा विश्वास माझ्या मनात जागृत करण्याचे काम मॅडमनीच केले असे मी विश्वासाने सांगतो... मी तर म्हणेन की, या जगात भगवंत नाही असे म्हणणाऱ्या सर्वांनीच एकदा मॅडमला भेटावं त्यांनाही नक्कीच भगवंत भेटल्याचा अनुभव आल्याशिवाय राहणार नाही... आज मॅडम माझ्या भगवंताच्याच ठिकाणी अगदी समर्थपणे विराजमान आहेत... हे निश्चित...

आज कारागृहात जवळपास ३००० पेक्षा जास्त बंदी आहेत. प्रत्येकाची मानसिक अवस्था अगदी माझ्यासारखीच खचलेली आहे. त्या सर्वांनाच एक नवी दिशा देण्याची, स्थिर करण्याची, जीवनाचा अर्थ समजावून सांगण्याची आवश्यकता आहे. तेव्हाच तेपण माझ्यासारखे स्थिर होतील, विश्वासाने जीवन जगतील, स्वतःच्या सुप्तशक्तींना जागृत करू शकतील...

Thank you for all Madam....

सी/२५३० राजेंद्र शंकर राऊत.
नाशिकरोड मध्यवर्ती कारागृह
नाशिक, सर्कल - ३/5.